# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.08.2025** **वारःशनिवार**

---

1. ऑनलाइन गेमिंगचा प्रसार आणि नियमन विधेयक, 2025 सह प्राप्तीकर विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 29 तारखेपासून चार दिवस जपान आणि चीन दौऱ्यावर
3. संपूर्ण देशभर आज राष्ट्रीय अंतराळ दिन
4. बल्गेरियात सुरू असलेल्या 20 वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत महिला गटात भारताच्या काजल दोचकला सुवर्ण पदक

**राष्ट्रपती**

ऑनलाइन गेमिंगचा प्रसार आणि नियमन विधेयक, 2025 ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल मंजुरी दिली. हे विधेयक परवा लोकसभेत, तर काल राज्यसभेत मंजूर झालं होतं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देणं आणि त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार केली जाईल. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपानं पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं. याद्वारे, अशा गेम्समध्ये फसवणूक होऊन नागरिकांवर, विशेषतः तरुणांवर होणारे सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि गोपनीयतेशी संबंधित दुष्परिणाम टाळायला मदत होईल. प्राप्तीकर कायदा 2025लाही काल राष्ट्रपतींनी मंजुरी दिल्यानंतर त्याचं राजपत्र प्रकाशित झालं. प्राप्तीकराशी संबंधित कायद्यांचं एकत्रीकरण आणि दुरुस्ती हा कायदा करतो. हा नवा कायदा पुढच्या वर्षी 1 एप्रिलपासून लागू होणार आहे.

**पंतप्रधान-बिहार पूल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्यांच्या बिहार दौऱ्यात 13 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. गंगा नदीवर उभारण्यात येणाऱ्या 6 पदरी पूलामुळे उत्तर आणि दक्षिण बिहारच्या विकासाला चालना मिळेल असं पंतप्रधानांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**पंतप्रधान चीन-जपान दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 29 तारखेपासून चार दिवस जपान आणि चीन दौऱ्यावर जाणार आहेत. पंतप्रधान मोदी 15 व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी 29 आणि 30 ऑगस्ट हे दोन दिवस

जपानला भेट देणार आहेत. पंतप्रधानांचा हा आठवा जपान दौरा असेल. तर जपानचे पंतप्रधान शिगेरु इशिबा यांच्या समवेत ते पहिल्यांदाच या शिखर परिषदेत सहभागी होतील. या दौऱ्यात ते त्यांच्या समपदस्थांसमवेत संरक्षण, सुरक्षा, व्यापार आणि अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान अशी क्षेत्रांमधल्या भारत आणि जपान यांच्यातील विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारीचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान मोदी 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबर रोजी तियानजिन होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेसाठी चीनला रवाना होतील. या परिषदेच्या पाश्र्भूमीवर चीनमध्ये ते अनेक जागतिक नेत्यांनाही भेटणार आहेत.

**<u>सेमीकॉन</u>**

येत्या 2 सप्टेंबरपासून तीन दिवस नवी दिल्लीत चौथ्या सेमीकॉन इंडिया 2025 चं आयोजन करण्यात आलं असून त्याचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स आणि सेमी कंडक्टर मूल्य साखळीतली देशाच्या वाढत्या क्षमता आणि महत्त्वाकांक्षांचं दर्शन घडवणं हा या तीन दिवसीय प्रदर्शनाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. या प्रदर्शनात पहिल्यांदाच जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर आणि मलेशिया या देशांच्या चार आंतरराष्ट्रीय दालनांचा समावेश असणार आहे, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस कृष्णन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<u>जीएसटी बैठक</u>**

पुढील महिन्याच्या 3 आणि 4 तारखेला नवी दिल्लीत वस्तू आणि सेवा जीएसटी परिषदेची 56 वी बैठक होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात येणार आहे. यापूर्वीची जीएसटी परिषदेची बैठक गेल्या वर्षीच्या डिसेंबरमध्ये राजस्थानात जैसलमेर इथं झाली होती. त्यामध्ये पोषणयुक्त तांदळावरील जीएसटी दरात 5 टक्क्यांपर्यंत कपात करण्यासह इतर अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले होते.

**<u>राजनाथ</u>**

नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीला प्रोत्साहन देऊन आणि स्थानिक कंपन्यांना वाढीसाठी पोषक वातावरण तयार करुन एक मजबूत संरक्षण यंत्रणा देश तयार करत आहे, असं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल नवी दिल्लीत एका कार्यक्रमात केलं. पाचव्या पिढीचं लढाऊ विमान आणि विमानांचं इंजिन तयार करणं तयार करायच्या दिशेनं भारताचा प्रवास सुरू आहे, असंही सिंह यांनी सांगितलं. सर्व परदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदारांनी भारतातल्या संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

**<u>अंतराळ दिवस</u>**

दूसरा राष्ट्रीय अंतराळ दिवस आज संपूर्ण देशभर साजरा केला जात आहे. 23 ऑगस्ट 2023 या दिवशी भारताच्या चंद्रयान-3 मिशनअंतर्गत विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हर चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीत्या उतरवण्यात आलेल्या घटनेची आठवण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणं हा भारताच्या यशातला एक महत्वपूर्ण टप्पा आहे. यामुळे भारत चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणारा चौथा देश आणि दक्षिण ध्रुवाजवळ जाणारा पहिला देश ठरला. आर्यभट्ट ते गगनयान: प्राचीन ज्ञानातून अनंत संधी अशी यंदाच्या राष्ट्रीय अंतराळ दिनाची संकल्पना आहे. यानिमित्त भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात ISROनं काल नवी दिल्लीत राष्ट्रीय अंतराळ

परिषदेचं आयोजन केलं होतं. या परिषदेत मंत्रालयं, खाजगी भागधारक, शैक्षणिक संस्था, स्टार्टअप्स आणि तज्ञ सहभागी झाले होते.

**राजदूत**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांचे निकटवर्तीय सहायक सर्गियो गोर यांची भारतातील राजदूत तसंच दक्षिण आणि मध्य आशियातील कार्यासाठी विशेष दूत म्हणून नियुक्तीची घोषणा केली आहे. जगातल्या सर्वाधिक लोकसंख्येच्या देशासाठी आपल्या योजनांनुसार कार्य करू शकेल आणि अमेरिकेला पुन्हा महासत्ता बनवण्यासाठी मदत करू शकेल अशा त्यांना अशा व्यक्तीची गरज होती असं ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर याविषयी माहिती देताना म्हटलं आहे. याबाबतीत सर्जियो एक उत्तम राजदूत म्हणून काम करतील. त्यांनी ट्रम्प यांच्या प्रशासनात केंद्रीय भूमिका पार पाडली असल्याचं नमूद केलं. सिनेटद्वारे पुष्टी होईपर्यंत सर्जियो गोर्स त्यांच्या सध्याच्या व्हाइट हाउसच्या वर्तमान पदावर कार्यरत राहतील. एरिक गार्सेटी सध्या या पदावर असून त्यांनी 11 मे 2023 पासून यावर्षीच्या 20 जानेवारीपर्यन्त राजदूत म्हणून काम पाहिलं आहे.

**अमेरिका बडतर्फ**

अमेरिकेत ट्रम्प प्रशासनानं संरक्षण गुप्तचर संस्थेचे प्रमुख लेफ्टनंट जनरल जेफरी क्रूस आणि दोन वरिष्ठ कमांडर यांना बडतर्फ केलं आहे. अमेरिकेतल्या गुप्तचर संस्थांना भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी आणि ट्रम्प यांच्या विश्वासू व्यक्तींना उच्च पदावर नियुक्त करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**बुद्ध परिषद**

एकविसाव्या शतकात झालेल्या बुद्ध धम्मातील ज्ञानाच्या प्रसाराचा मागोवा घेण्याच्या उद्देशानं काल नवी दिल्लीत बौद्ध धर्माच्या युवा अभ्यासकांच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. या परिषदेत रशिया, व्हिएतनाम, कंबोडिया, श्रीलंका, म्यानमा, तैवान तसंच भारताताले धम्माचे युवा अभ्यासक, प्राध्यापक, भिक्खू तसंच अन्य मान्यवर एकत्र आले होते. आधुनिक युगात डिजिटल नवोन्मेष, आंतर-सांस्कृतिक संवाद, शिक्षण आणि वैयक्तिक आचरण या माध्यमातून बुद्ध धम्माचा अर्थपूर्ण प्रसार कसा करता येऊ शकेल याबाबत चर्चा करण्यात आली, असं सांस्कृतिक मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**विक्रमसिंघे कस्टडी**

श्रीलंकेचे माजी अध्यक्ष रणील विक्रमसिंघे यांनी सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्याच्या आरोपाखाली त्यांना येत्या 26 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी विक्रमसिंघे यांच्याविरुद्ध दोन फौजदारी आणि मालमत्ता कायद्यानुसार एक असे एकंदर तीन गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान 76 वर्षीय विक्रमसिंघे यांनी आपल्या प्रकृतीच्या तक्रारी आणि पत्नीला कर्करोगाचं निदान असल्याचं लक्षात घेऊन आपल्याला जामीन मिळावा यासाठी अर्ज दाखल केला आहे. विक्रमसिंघे यांनी 2023 मध्ये आपल्या पत्नीच्या पीएचडी पदवीदान सोहळ्याच्या निमित्ताने सरकारी पैशाचा वापर करून खासगी कारणांसाठी प्रवास केल्याचा आरोप आहे. त्यांनी या प्रवासावर जनतेसाठीच्या निधीतले जवळपास 50 हजार डॉलर्स खर्च केले होते.

**<u>बलुचिस्तान हल्ला</u>**

पाकिस्तानच्या नौदलानं अलीकडेच बलुचिस्तानच्या ओमारा, कोलवाह आणि आवरान या डोंगराळ भागात अचानक केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांबद्दल बलोच नॅशनल मुव्हमेंट संघटनेच्या मानवाधिकार विभागानं काल चिंता व्यक्त केली. या अकस्मात झालेल्या हल्ल्यांमुळे स्थानिक लोकांना मोठा धक्का बसला असून त्यांना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल धास्ती वाटत असल्याचं मानवाधिकार विभागानं म्हटलं आहे.

**<u>कुस्ती</u>**

बल्गेरियातील सामोकोव्ह इथं सुरू असलेल्या 20 वर्षांखालील वयोगटासाठीच्या जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत महिला गटात भारताच्या काजल दोचक हिनं काल सुवर्ण पदक पटकावलं. तर श्रुती आणि सारिका यांनी कास्य पदकं मिळवली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.